## प्रकरण पाचवे

## उ प सं हा र

## प्रकरण पाचवे

## उ प सं हा र

प्रस्तुत लघुप्रबंधात "रणजित देसाई" यांच्या "बारी" आणि "माझा गाव" या दोन कादंब-यांचा विचार केला आहे. मराठी वाङ्मयातील "कादंबरी" या वाङ्मय प्रकाराच्या निर्मितीप्रक्रियेचा विचार वेगवेगळ्या लेखकांच्या अनुषंगाने करता, रणजित देसाई यांच्या "बारी" आणि "माझा गाव" या प्रादेशिक कादंबरींची रूपे वेगळी असल्याचे जाणवते. म्हणून या दोन कादंबरींचे विशेष या लघुप्रबंधात पाहिले आहेत.

प्रकरण एक मध्ये "कादंबरीचे स्वरूप आणि ग्रामीण साहित्याचे विशेष" याचा विचार केला आहे. सुरूवातीस कादंबरीचे स्वरूप, व्याख्या पाहिल्या. त्यामध्ये कादंबरी या वाङ्मय प्रकाराबद्दल मतऐक्य नसल्यामुळे कादंबरी या शब्दाबाबत व कादंबरीच्या व्याख्येबाबत मत भिन्नता दिसून येते. परंतु "कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत अशी साहित्यकृती असते." ही भालचंद्र नेमाड्यांची व्याख्या गृहित धरून कादंबरी वाङ्मयात व्यापक जीवनाचे दर्शन कसे घडते, त्यामुळे कादंबरी ही कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण, भाषाशैली या चार घटकावर आधारलेली असते. या घटकांच्या आधारावरच मराठी कादंबरीचा उगम, वाटचाल व विकास झाला. पण सुरूवातीच्या कादंबरीमध्ये रूढ पध्दतीचे कथानक होते. ते नंतरच्या कादंबरीमध्ये बदलले. तर आपच्या कादंबरीकारांनी कथानकाची मातब्बरी मानलेली दिसत नाही.

त्यानंतर ग्रामीण साहित्याची वैशिष्ट्ये पाहिली आहेत. ग्रामीण जीवनाला ग्रामीण साहित्यात मानाचे स्थान असले. हे डॉ. गो.मा. पवार यांनी "ग्रामीण संवेदनशीलता" या निबंधातून पटवून दिले आहे. म्हणून

"ग्रामीण जीवनाचे, मनाचे चित्रण करणारे साहित्य व ग्रामीण साहित्य" हे त्यांचे विचार पटतात. पण ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक साहित्य या संज्ञाबाबत समीक्षकांमध्ये मतऐक्य दिसत नाही. तरीपण ग्रामीण ही संज्ञा ग्रामविशिष्ट अर्थ प्रकट करते आणि प्रादेशिक ही संज्ञा विशिष्ट भूप्रदेश असा अर्थ प्रकट करतात. त्यामुळे ग्रामीण या संज्ञेपेक्षा प्रादेशिक या संज्ञेची व्याप्ती मोठी असून ग्रामीणतेचा समावेश तिच्यामध्ये करता येईल. असा विचार अधिक योग्य वाटतो.

यानंतर ग्रामीण किंवा प्रादेशिक साहित्याचे विशेष पाहिले. यामध्ये ग्रामीण साहित्य आणि भौगोलिकता, ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण लोकांचे सामुदायिक जीवन, ग्रामीण साहित्य आणि निसर्ग, ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण भागातील बोली भाषा, ग्रामीण साहित्य आणि कृषिजीवन, ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण संस्कृती, रूढी, परंपरा, ग्रामीण साहित्य आणि खेड्यांची रचना व ग्राम जीवन, ग्रामीण साहित्य आणि कुटुंबव्यवस्था या गोष्टींचा विचार केला. शेवटी ग्रामीण आणि प्रादेशिक यात भेद मानावयाचा झाला तर ग्रामीणपेक्षा प्रादेशिक संज्ञेची व्याप्ती मोठी आहे. त्यामुळे प्रादेशिकतेमध्ये ग्रामीणतेचा समावेश होऊ शकतो. अशा तऱ्हेने पहिल्या प्रकरणामध्ये कादंबरीचे स्वरूप आणि ग्रामीण साहित्याचे विशेष याचा विचार केला.

दुसऱ्या प्रकरणामध्ये रणजित देसाई यांच्या "बारी" कादंबरीचे विशेष पाहिले आहेत. यामध्ये "बारी" कादंबरीचे कथानक, आशयसूत्र, व्यक्तिचित्रण, सामाजिकतेचे चित्रण, भाषाशैली, आणि निवेदन या बाबींचा विचार केला आहे.

"बारी" कादंबरीत बेरड जमातीचे चित्रण केले आहे. बेरडांच्या पारंपारिक जीवनात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बदल होतो. या बदलत्या जीवनाला

ईश्वरासारखे आधुनिक विचाराचे बेरड प्रतिसाद देतात. तर तेग्यासारख्या जुन्या विचाराच्या बेरडांना या बदलत्या जीवनाशी समरस होता येत नाही. याचा विचार "बारी" कादंबरीच्या कथानकामध्ये केला आहे.

याचबरोबर स्वातंत्र्यानंतर बेरड जमाती सारख्या मागासलेल्या लोकांच्याकडे सरकारची कृपादृष्टी वळली. या पार्श्वभूमीवर बेरडांच्याही पारंपरिक जीवनात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बदल होतो. हा "बारी" कादंबरीचा मुख्य आशय असल्यामुळे याचा विचार "बारी" कादंबरीच्या आशयसूत्रामध्ये केला आहे.

"बारी" कादंबरीच्या व्यक्तिचित्रणामध्ये तेग्या, काळू, चंद्रोजी, नागी, मल्ला, ईश्वरा, इनामदार इत्यादी पात्रांची व्यक्तिचित्रणे "बारी" कादंबरीत आली आहेत. त्यापैकी तेग्या, काळू, मल्ला, चंद्रोजी, नागी ही पात्रे परंपरावादी बेरडवृत्तीच्या विचाराशी जखडून आहेत. त्यामुळे विशिष्ट प्रदेशातील विशिष्ट जातीचा गुणधर्म म्हणून खून, दरोडे, लुटमार करणे. हे परंपरावादी विचार या जुन्य जमान्याच्या बेरडांच्या व्यक्तिचित्रणातून दिसून येतात. तर ईश्वरा व त्याचे जोडीदार यांच्या आधुनिक विचारसरणीमुळे ते नव्या जीवनाचा स्वीकार करतात. त्यामुळे परंपरावादी तेग्या सारखे बेरड व आधुनिक ईश्वरा यांच्यात संघर्ष निर्माण होतो. यातुनच बेरडांच्या व्यक्तिरेखा प्रकट होतात. याचा अभ्यास "बारी" कादंबरीतील व्यक्तिरेखा या भागामध्ये केला आहे.

"बारी" कादंबरीतील बेरडांच्या सामाजिक जीवनावरही लेखकाने प्रकाश टाकला आहे. त्यामध्ये ग्रामीण परिसरात एक लहानसा भाग असलेले बेरड जमातीचे परंपरागत जीवन. या बेरडांच्या परंपरागत जीवनात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बदल होतात. त्यामुळे या बेरडांना बदलत्या समाजव्यवस्थेशी मिळते-जुळते घेता येत नाही. म्हणून या जमातीला भवितव्या विषयी असणारी

काळजी. जगण्याची धडपड आणि तडफड या सर्वांतून "बारी" कादंबरीतील सामाजिक जीवनाचे चित्रण दिसून येते. यांचा विचार "बारी" कादंबरीच्या सामाजिक चित्रणामध्ये केला आहे.

बेरडांचे जग हे मागासलेले, अशिक्षित, शहरी, पांढरपेशा संस्कृती-पासून दूर आहे. त्यामुळे त्यांची बोली बेळगांव जवळील सुतगट्टीच्या जंगला-तील आहे, हे स्पष्ट दिसते. तसेच बोलीतील ग्रामीणपणाही दिसून येतो. ही बेरडांच्या बोली भाषेची लकब "रणजित देसाई" यांनी बेरडांच्या बरोबर प्रत्यक्ष अनुभव घेवूनच वापरली आहे. त्यामुळे बेरडांच्या बोलीतील म्हणी, वाक्प्रचार बेरडांच्या शिव्या देण्याच्या पध्दती, तसेच बेरडांच्या भाषेची विशिष्ट अशी धाटणी इत्यादी अनेक वैशिष्टये "बारी" कादंबरीत व्यक्त झालेली आहेत. यांचा विचार "बारी" कादंबरीच्या भाषाशैलीचा विचार करताना केला आहे.

त्याचप्रमाणे "रणजित देसाई" यांनी "बारी" कादंबरीच्या निवेदना-साठी प्रमाण भाषेचा वापर केला आहे व पात्रांच्या संवादासाठी त्यांच्या बोलीचाच वापर केला आहे. त्यामुळे "बारी" कादंबरीतील बेरडांची बोली चटकन लक्षात येते. तसेच वेगवेगळ्या स्तरातील पात्राप्रमाणे ही बोली बदलताना दिसून येते. त्यामुळे ती ती पात्रे चटकन लक्षात येतात. त्यामुळे निवेदनाची भाषा आणि बोली भाषा यातील फरक लक्षात येतो. याचा विचार "बारी" कादंबरीच्या निवेदनामध्ये केला आहे.

तिसऱ्या प्रकरणामध्ये रणजित देसाई यांच्या "माझा गाव" कादंबरीचे विशेष पाहिले आहेत. यामध्ये "माझा गाव" कादंबरीचे कथानक, आशय-सूत्र, व्यक्तिचित्रण, सामाजिकतेचे चित्रण, भाषाशैली आणि निवेदन या बाबींचा विचार केला आहे.

"माझा गाव" कादंबरी मध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील जुने खेडेगाव रणजित देसाई यांनी चित्रित केले आहे. या गावात असणारा इनामदार, त्यांचा गावावर असणारा वचक. तसेच गावातील ब्राह्मण वर्ग, त्यांची समाजसेवा वृत्ती. यांच्यावर गावक-याचा असणारा विश्वास. गावक-यांची पारंपरिक वृत्ती. संकटकाळी एकमेकाना मदत करण्याची वृत्ती आणि शेवटी आप्पासाहेब, तात्या-काकी हे गावचे तीन आधारस्तंभ निघून गेल्यावर सर्व गावाला होणारे दु:ख असे गोष्टीचे चित्रण या कादंबरीत आले आहे.

जुन्या खेड्यातील माणूस स्वत:ला समाजाशी कसा बांधून घेतो. या खेड्यातील माणूस कसा होता. प्रत्येक माणसाचा एकमेकाशी कसा संबंध असतो. गाव कस एकसंघ असते. वेळप्रसंगी, संकटकाळी खेड्यातील माणसे एक-मेकांना कशी मदत करतात. म्हणजे संपूर्ण गाव कसे जगत असते. याचा विचार "माझा गाव" कादंबरीच्या आशयसूत्रामध्ये केला आहे.

"माझा गाव" कादंबरीतील व्यक्तिचित्रणे ही कथानकाला पूरक अशी आहेत. या कादंबरीतील महत्त्वाची व्यक्तिरेखा "आप्पासाहेब इनामदार" हे आहेत. त्यामुळे संपूर्ण कादंबरी या व्यक्तिरेखेभोवती फिरताना दिसते. या इनामदारांचा सा-या गावावर दरारा असतो. हे इनामदार विचारवंत, प्रेमळ, सहनशील, हुशार तसेच प्रसंगी रागीट आणि तापट अशा विविध स्वभाव दिसतात. तसेच तात्यांच्या व्यक्तिरेखेतून एका समाजसेवकाचे चित्र रेखाटले आहे. तात्या गावच्या प्रत्येक संकटाच्यावेळी गावक-याना मदत करीत असतात. त्यामुळे गावकरी लोकही तात्याना मान देतात. हे तात्यां-च्या व्यक्तिचित्रणातून दिसून येते. उमाच्या रूपाने प्रेमळ, सत्वशील, प्रति-व्रता, सगळ्याना सांभाळून घेणारी असे तीचे चांगले गुण दिसून येतात. त्यामुळे ती भारतीय संस्कृतीतील आदर्श स्त्री वाटते. रावबाचे वर्तन वाईट आहे. हे त्याचे वागणे इनामदार घराण्याला शोभणारे नाही. त्यामुळे त्याचे

व्यक्तिचित्रण उन्मत्त वाटते. तसेच हौसाचे वर्तन खेडेगावातील निती-विचाराशी सुसंगत नसल्याने ती वाईट वागणारी आहे. त्यामुळे लेखकाने हौसाच्या चित्रणातून गावातील अनैतिक वर्तन करणाऱ्या स्त्रीचे चित्र उभे केले आहे. जयवंत या किशोरावस्थेतील लहान मुलाच्या व्यक्तिचित्रणातून मिष्कील, खेळकर वातावरणाची निर्मिती केली आहे. अशा तऱ्हेने व्यक्ति-चित्रणांचा अभ्यास "माझा गाव" कादंबरीमध्ये केला आहे.

यानंतर "माझा गाव" कादंबरीमधील सामाजिकतेचे चित्रण या बाबीचा विचार केला आहे. "माझा गाव" मधील माणसे एकटी-एकटी जगताना दिसत नाहीत. संकट-काळी, वेळप्रसंगी या गावातील माणसे एकमेकांना मदत करतात. या गावचे इनामदार, त्यांच्या घरातील नोकर-चाकर, गावातील गरीब लोक, शेतकरी कुळे, बलुतेदार, ब्राह्मण वर्ग यांच्या सहकार्यानेच या गावचा कारभार चाललेला असतो. तसेच गावातील देवधर्म, जत्रा, जत्रेतील कुस्त्या, सण-उत्सव. यावेळचे मान-पान, या सणासुधीच्या दिवशी या गावचे लोक एकत्र येऊन जसे आनंद लुटीत असतात. त्याचप्रमाणे संकट-काळी एकत्र येऊन एकमेकाला मदत करीत असतात. याचे विवेचन "माझा गाव" कादंबरीच्या सामाजिक चित्रणामध्ये केले आहे.

यानंतर "माझा गाव" कादंबरीच्या भाषाशैलीचा विचार केला आहे. "माझा गाव" या कादंबरीत लेखकाने महाराष्ट्रातील एक खेडेगाव चित्रित केले आहे. त्याकरिता त्या खेडेगावातील बोलीभाषेचा, शब्दांचा, म्हणी, वाक्प्रचार, शिव्या, विनोद, उपमा-अलंकार इत्यादी भाषाशैलीच्या विविध गुणांचा वापर केला आहे. याकरिता खेड्यातील इनामदार घराणे, इनाम-दार घराण्यातील नोकर-चाकर तसेच गावातील लोक या सर्वांचे वागणे, बोलणे यातूनच "माझा गाव" कादंबरी मधील भाषाशैलीची वैशिष्टये प्रकट होतात. ही भाषेची लकब "रणजित देसाई" यांनी प्रत्यक्ष अनुभवानेच वापरली आहे.

कारण लहानपणी रणजित देसाई कोल्हापूरात असताना त्यांचा संबंध राजघराण्याशी आलेला होता. त्यावेळी त्या व्यक्तींची बोलणी, संभाषणे, वर्तन, क्रियाप्रतिक्रिया या सर्व गोष्टींचा त्यांना प्रत्यक्ष अनुभव असल्यामुळे "माझा गाव" कादंबरीमध्ये त्याच भाषेचा वापर केला आहे.

"माझा गाव" कादंबरीच्या शेवटी निवेदनाचा विचार केला. "माझा गाव" कादंबरीमध्ये पहिल्याप्रास्ताविक प्रकरणात आणि शेवटच्या बावीसाव्या प्रकरणात प्रथम पुरुषी निवेदन आले आहे व मधल्या एकवीस प्रकरणांत तृतीय पुरुषी निवेदन आले आहे. अशा त-हेने रणजित देसाई यांनी या कादंबरीच्या पहिल्या व शेवटच्या प्रकरणामध्ये प्रथम पुरुषी निवेदन वापरले आहे. त्यामुळे संबंध कादंबरी वाचकाच्या मनात पुन्हा एकदा सलग उभी राहते. हे या कादंबरीतील निवेदनाचे वैशिष्ट्ये होय.

प्रकरण बारमध्ये रणजित देसाई यांच्या "बारी" आणि "माझा गाव" या दोन कादंब-यांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. रणजित देसाई यांनी "बारी" आणि "माझा गांव" ह्या दोन्ही कादंब-या एकापोठोपाठ लिहिल्या आहेत. या दोन कादंब-यांची तुलना करता असे जाणवते की, त्यांचे घडत गेलेले व्यक्तिमत्व आणि जीवनात आलेले प्रत्यक्ष अनुभव यातुनच या दोन्ही कादंब-या साकार झाल्या आहेत.

एका उपेक्षित बेरडांच्या जीवनात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कसा बदल होतो. हे "बारी" कादंबरीचे कथासूत्र आहे. तर परंपरागत खेड्यावातील सरकारी इनामदार घराणे, आणि त्या घराण्यावर आधारीत असलेले खेडे गावातील लोक. यांचे परस्पर संबंध कसे असतात हे "माझा गाव" कादंबरीचे कथासूत्र आहे. तसेच या दोन्ही कादंबरीच्या कथासूत्रांची अखेर शोकात्म आहे. "बारी" कादंबरीच्या शेवटी बदलत्या जीवनाशी तेग्यासारख्या बेरडांना मिळते-जुळते घेता येत नाही. त्यामुळे त्यांच्या विषयी वाटणारी ललक

स्पष्ट दिसते. म्हणून हा शेवट दु:खदायक वाटतो. तसेच "माझा गाव" कादंबरीच्या शेवटी आप्पासाहेब, तात्या, काकी यांचा मृत्यू होतो. म्हणून हा ही शेवट दु:खदायक वाटतो. पण एकाच गावची महत्त्वाची तीन माणसे एकापोटोपाट जाणे ही घटना काल्पनिक वाटते. अशी कल्पनीकता "बारी" कादंबरीच्या शेवटामध्ये दिसत नाही. तसेच "बारी" कादंबरीचे कथानकाची गुंफण प्रत्ययकारी झाली आहे. त्यामुळे "माझा गाव" पेक्षा "बारी" कादंबरीचे कथानक स्वभाविक स्वरूपाचे वाटते.

यानंतर "बारी" व "माझा गाव" या दोन कादंबरींच्या आशयसूत्रांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. या दोन्ही कादंबरींची आशयसूत्रे लक्षात घेता, "बारी" कादंबरीच्या आशयसूत्रामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जशी बदलती समाजव्यवस्था दिसून येते, तशी बदलती समाजव्यवस्था "माझा गाव" कादं-बरीच्या आशयसूत्रात दिसून येत नाही. "बारी"मध्ये स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर या दोन्ही काळातील बेरडांचे जीवन कोणत्या प्रकारचे होते आणि त्यात बदल कोणत्या प्रकारे झाला यांची मांडणी लेखकाने केली आहे. आणि त्यानुषंगाने बेरड जमात आणि गावातील इतर लोक यांच्यातील संबंधाचे चित्रणही लेखकाने केले आहे. मुख्यत: बेरडांच्या जीवनातील बदलाचे चित्रण करणारे या कादंबरीचे सूत्र आहे. तर "माझा गाव" या कादंबरीत स्वातंत्र्यपूर्व काळातील एका सरंजामदारी गावातील जीवनाचे चित्रण येते. अशा गावाचे चित्रण करणे हेच कादंबरीचे आशयसूत्र आहे. ही अशा प्रकारची आशयसूत्रे आणि त्यानुसार केलेली कथेची मांडणी या दोन्ही गोष्टींचा विचार करता बारी कादंबरीतील चित्रण अधिक नेटकेपणाने व्यक्त झाले आहे असे म्हणता येईल.

याच्यापुढे "बारी" आणि "माझा गाव" या दोन कादंब-यातील व्यक्तिचित्रणाचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. या दोन्ही कादंबरीमधील

व्यक्तिचित्रणे ही लेखकाच्या प्रत्यक्ष अनुभवातून आकाराला आली आहेत. "बारी"तील तेग्या, काळू, चंद्रोजी, नागी, ईश्वरा, मल्ला या पात्रांच्या व "माझा गाव" मधील आप्पासाहेब, तात्या उमा, रावबा, हौसा, जया या पात्रांच्याही जनमानसात दृढमूल असलेल्या प्रतिमांना देसाई यांनी धक्का लावलेला नाही. तसेच दोन्ही कादंब-यातील माणसे भिन्न सामाजिक धरातील असली, त्यांच्या कर्तृत्वाच्या वाटा वेगवेगळ्या असल्या तरी ती एकाच मुशातली माणसे आहेत. हा त्यांचा व्यक्तिचित्रणाचा विशेष या दोन्ही कादंब-यात दिसून येतो. पण "बारी" कादंबरीतील पात्रांची व्यक्तिचित्रणे ही ठसठसीपणातून कसदार झाल्यामुळे ती "माझा गाव" कादंबरीमधील व्यक्तिचित्रणापेक्षा अधिक चांगली वाटतात. याचा तुलनात्मक अभ्यास चौथ्या प्रकरणामध्ये केला.

यानंतर "बारी" व "माझा गाव" या दोन कादंबरींच्या सामाजिक जीवन चित्रणांचा तुलनात्मक अभ्यास केला. "बारी" कादंबरीत बेरडांच्या सामाजिक जीवनामध्ये वास्तवता दिसून येते. तशी वास्तवता "माझा गाव" कादंबरीमधील लोकांच्या सामाजिक जीवनचित्रणामध्ये दिसत नाही. त्यामुळे "माझा गाव" कादंबरीच्या सामाजिक जीवन चित्रणामध्ये कृत्रिमता आली. तसेच "माझा गाव" कादंबरीच्या कलात्मकतेत उणीव दिसून येते. ही उणीव "बारी" कादंबरीमध्ये दिसत नाही. त्यामुळे "माझा गाव" कादंबरीपेक्षा "बारी" कादंबरी सामाजिक चित्रणाच्या बाबतीत चांगली ठरते. याचा अभ्यास या शोधप्रबंधाच्या चौथ्या प्रकरणातच केला आहे.

तसेच "बारी" आणि "माझा गाव" या दोन कादंबरीच्या भाषाशैलीचा तुलनात्मक विचार केला. त्यामध्ये "माझा गाव" कादंबरीतील भाषेपेक्षा "बारी" कादंबरीतील भाषा अधिक चांगली वाटते. कारण "बारी" कादंबरीतील भाषा ही खास बेरडांची भाषा वाटते. त्याच्या बोलीतील ग्रामीणपणा चटकन

डोळ्यात भरतो. बेरडांचे बोलताना होणारे शारीरिक हावभाव. त्यांच्या बोलीतील म्हणी, गाणी, शिव्या, भाषेची विशिष्टय धाटणी स्पष्ट दिसते. तसेच त्यांच्या बोलीतील कठोरपणा रोखठोकपणा हे गुणधर्मही स्पष्ट दिसतात. हे भाषेचे गुणधर्म "माझा गाव" कादंबरीमध्ये दिसत नाहीत. म्हणून भाषाशैलीच्या दृष्टीनेही "माझा गाव" कादंबरी-पेक्षा "बारी" कादंबरी सरस ठरते.

शेवटी "बारी" व "माझा गाव" या दोन कादंबरीच्या निवेदन पद्धती-चा तुलनात्मक अभ्यास या चौथ्या प्रकरणामध्ये केला आहे. या दोन्ही कादंबरीची तुलना करतांना निवेदनाची भाषा ही नागर असून, पात्रांच्या तोंडी ग्रामीण बोलीच ठेवली आहे. पण "माझा गाव" कादंबरीमध्ये पहिल्या व शेवटच्या प्रकरणामध्ये प्रथम पुरुषी निवेदनाचा वापर केला आहे. आणि मधील प्रकरणात तृतीय पुरुषी निवेदन आले आहे. तरी "बारी" कादंबरीचे संपूर्ण निवेदन हे तृतीय पुरुषी आहे. अशा त-हेने "माझा गाव" कादंबरीच्या निवेदनामध्ये विसंगती दिसून येते. तशी विसंगती "बारी" कादंबरीच्या निवेदनामध्ये दिसून येत नाही. त्यामुळे निवेदनाच्या बाबतीतही "माझा गाव" कादंबरीपेक्षा "बारी" कादंबरी सरस वाटते. याचा अभ्यास चौथ्या प्रकरणाच्या शेवटी केला आहे. अशा त-हेने "रणजित देसाई" यांच्या "बारी" आणि "माझा गाव" या दोन कादंबरीचा विचार या लघु-प्रबंधात केला आहे.

.......

## साधन ग्रंथ सूची


१) चंद्रकांत बांदिवडेकर, "मराठी कादंबरी इतिहास" १९८९,
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

२) भालचंद्र फडके, "प्रदक्षिणा" (भाग पहिला) सातवी आवृत्ती,
कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयनगर, पुणे-३०.

३) भालचंद्र नेमाडे, "कादंबरी परिसंवाद, मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप"
(१९५०-१९७५) संपादक. गो.मा.पवार, म.द. हातकणंगलेकर, पॉप्युलर
प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८६.

४) ना.सी. फडके, "मराठी कादंबरी वाटचाल" परिसंवाद, पुणे.

५) आनंद यादव, "ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या",
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०.

६) प्रा.स.शि. भावे, प्रस्तावना, "ग्रामीण साहित्य आणि वास्तव"
आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, प्रथमावृत्ती १९८१.

७) रणजित देसाई, "बारी" मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, तिसरी
आवृत्ती, ४ जानेवारी १९८८.

८) आनंद यादव, "मराठी साहित्य समाज आणि संस्कृती",
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, प्रथमावृत्ती १९८५.

९) गो.मा. पवार, "साहित्यातील प्रादेशिकता: भाषा आणि निवेदन"
निबंध.

१०) रणजित देसाई, "माझा गाव" अनिलकुमार मेहता, प्रकाशक अजब
पुस्तकालय, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती, ११ ऑगस्ट १९८०.

## - नियतकालिके -

१) गो.मा. पवार, "ग्रामीण संवेदनशीलता" सकाळ पुरवणी, १ ऑगस्ट १९८१.

२) भीमराव गस्ती, "बेरड आणि बारी" रविवार सकाळ १३ ऑक्टोबर १९९१.

.....